**वाचा** :- १)म.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडील ज्ञापन आरोग्य/अस्था५/६५०/२०१३ दि.६/६/२०१३
२) म.मु.का.अजि.प.नाशिक यांचेकडील नेमणुक आदेश क्रमांक आरोग्य /अस्था५/१२३१/२०१३ दि.२५/११/२०१३
३) सहा.आयुक्त (चौकशी),नाशिक विभाग नाशिक यांचेकडील पत्र क्र.विशा-४/खाचौ/सीआर-३०९/२०१५ दि.१५/४/१७
४) या कार्यालयाची अंतिम कारणे दाखवा नोटीस क्रमांक आरोग्य/अस्था५/१३०६/२०१७ दि.९/१०/२०१७
५) श्रीम.पगार,आरोग्य सेविका यांचा अं.का.दा.नोटीसीस खुलासा दि.१६/१०/२०१७
६) या कार्यालयाची मंजुर टिपणी दिनांक :-१६/१०/२०१७

---

**नाशिक जिल्हा परिषद, नाशिक**
जा.क्र.आरोग्य/अस्था५/१३३० /२०१७
नाशिक दिनांक: १८/१०/२०१७

**आदेश**

श्रीम.वनिता यशवंत कुलकर्णी ,आरोग्य सेविका, प्रा.आ.केंद्र धामणगाव उपकेंद्र धामणगाव ता.ईगतपुरी येथे कार्यरत असताना मुख्यालयी न राहणे,प्रसुती झालेली नसताना संस्थेत प्रसुती झालेचे दर्शविले व शासनाची दिशाभुल करणे,मातांना दयावयाचे जननी सुरक्षा योजनेच्या संस्थेत प्रसती झालेली नसताना लाभ देणे,वैदयकिय सेवेसंबंधी टॅब्लेट रजिस्टर न ठेवणे व अभिलेख अदयावत न ठेवणे,वैदयकिय सेवेबाबत माहीतीचे भित्तीपत्रके न लावणे ,लसीकरणाशी संबंधीत महीनावार कार्ड बॉक्स व कार्डची स्थळप्रत न ठेवणे,IPHS अंतर्गत उपकेंद्र असताना अस्वच्छता ठेवणे,भारतीय सार्वजनिक आरोग्य मानांकित (IPHS) उपकेंद्र असताना संस्था मानांकित होणे किंवा शासनाने दिलेल्या कोणत्याही सुचनांचे अंमलबजावणी न करणे,आरोग्य सेवेपासुन लाभार्थींना लाभापासुन वंचित ठेवणे याबाबत कर्तव्यात कसुर केल्याचे निर्दशनास आल्याने ज्ञापन क्र.आरोग्य/अस्था५/ ६५०/२०१३ दि.६/६/२०१३ अन्वये खालीलप्रमाणे खातेचौकशी सुरु करण्यात आली.

प्रस्तुत ज्ञापन व परिशिष्ट १ ते ४ हे श्रीम.वनिता यशवंत कुलकर्णी,आरोग्य सेविका, यांना बजाविणेत आल्याने विहीत मुदतीत खुलासा सादर केलेला नसल्याने प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील)नियम १९६४ चा नियम ६ (३) नुसार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नाशिक यांचे कडील आदेश क्र आरोग्य/अस्था५/१२३१/२०१३ दि.२५/११/२०१३ अन्वये सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग नाशिक यांची नेमणुक करणेत आलेली होती.

सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग नाशिक यांचेकडील पत्र क्र. पत्र क्र.विशा-४/खाचौ/सीआर-३०९/१५ दि.१५/४/२०१७ अन्वये चौकशी अहवाल प्राप्त झाला आहे. चौकशी अहवालात नमुद केलेनुसार १) वैदयकिय सेवक संबंधी अभिलेख अदयावत नसलेबाबत २) फिरती कार्यक्रमानुसार गृहभेटी नसलेबाबत ३) डेली टॅब्लेट रजिस्टर ठेवणेत आले नसलेबाबत ४) लसीकरण संबंधीत महीनावर कार्ड बॉक्स व कार्ड स्थळप्रत उपलब्ध नाहीत असे १० पैकी ४ आरोप अंशतः सिद्ध होत असलेने मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नाशिक यांचेकडील अंतिम कारणे दाखवा नोटीस आरोग्य/अस्था५/१३०६/२०१७ दि.९/१०/२०१७ अन्वये श्रीम.वनिता यशवंत कुलकर्णी आरोग्य सेविका, यांना महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ भाग तीन - चे नियम ४ (२) नुसार **२ वेतनवाढी भावी वेतनवाढीवर कामयस्वरुपी परिणाम होईल अशा रितीने बंद करणेची कारवाई का करणेत येवु नये? तसेच निलंबन कालावधी हा निलंबन कालावधी म्हणुन का धरणेत येवु नये ? याबाबत विचारणा करण्यात येवुन दि.१६/१०/२०१७ रोजी खुलासा मागविणेत आला होता.**

प्रस्तुत अंतिम कारणे दाखवा नोटीसीचे आदेशास श्रीम.वनिता यशवंत कुलकर्णी,आरोग्य सेविका, यांनी खुलासा दि.१६/१०/२०१७ रोजी सादर केलेला आहे. प्राप्त खुलाशात नमुद केलेनुसार ०४ दोषारोप अंशतः सिद्ध झाल्याने त्यांना सदर आरोप मान्य नसलेने सदर आरोपांतुन मुक्तता करणेस विनंती केलेली आहे.तरी सर्व परिस्थिती विचारात घेता सदर प्रकरणी नियुक्ती प्राधिकारी या नात्याने मी.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नाशिक **महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे भाग-तीन कलम ४(    ) नुसार प्राप्त अधिकाराचा वापर करुन श्रीम.वनिता यशवंत कुलकर्णी,आरोग्य सेविका, (म) यांना** दोन वेतनवाढी पुढिल एक वर्षासाठी तात्पुरत्या स्वरुपात बंद करण्याची **शिक्षा देत आहे.**

प्रस्तुत आदेशाची नोंद श्रीम.वनिता यशवंत कुलकर्णी,आरोग्य सेविका,यांचे मुळसेवापुस्तकात घेण्यात यावी.

17/10

(दीपक कुमार मीना)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद नाशिक**

**प्रति,**

**श्रीम.वनिता यशवंत कुलकर्णी,आरोग्य सेविका,प्रा.आ.केंद्र धामणगाव उपकेंद्र धामणगाव ता.ईगतपुरी**
**व्दाराः- गटविकास अधिकारी पंचायत समिती ईगतपुरी**

**प्रतः- गटविकास अधिकारी पंचायत समिती ईगतपुरी**

२/- समवेत आदेशाच्या ३ प्रती जोडलेल्या असुन त्यापैकी १ प्रत श्रीम.वनिता यशवंत कुलकर्णी ,आरोग्य सेविका, यांना बजावून दुसऱ्या प्रतीवर दिनांकित स्वाक्षरी घेऊन सदरची प्रत इकडेस सादर करावी.

**प्रतः- अस्थापना विभाग -५ आरोग्य विभाग जि.प.नाशिक**

17/10

(दीपक कुमार मीना)
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद नाशिक**